| CNR No. MHPU-2300-1700-2019 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | ०३/०५/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | ०३/०५/२०१९ |
| | निकाल दिनांक | **०४/०८/२०२६** |
| | कालावधी | **०७ व. ०३म. ०२दि.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड–राजगुरुनगर, जि. पुणे यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती जे.सी.गुप्ता)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.३५१/२०१९**

**नि.क्र.४८**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, **चाकण,**<br>ता.खेड–राजगुरुनगर, जि.पुणे. |
| **तक्रारदारातर्फे विधीज्ञ** | **श्रीमती ए. एस. चव्हाण थोरात** |
| **आरोपी** | **१) सुभाष वामन दौंडकर**<br>वयः ५१ वर्षे, व्यवसायः शेती,<br>**२) राहुल बाळासाहेब दौंडकर**<br>वयः ३० वर्षे, व्यवसायः शेती,<br>**३) प्रतिक सुभाष दौंडकर**<br>वयः १८ वर्षे, व्यवसायः शेती,<br>सर्व रा.साळींबाचा मळा, शेलपिंपळगाव,<br>ता. खेड–राजगुरुनगर, जि. पुणे. |

| | |
|---|---|
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | **श्रीमती. एस. पी. शिंदे** |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३/०४/२०१७ |
| आरोपीच्या नावे इश्यु प्रोसेस दिनांक | – |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | ०३/०५/२०१९ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | ०३/०८/२०१९ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | १२/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | **०४/०८/२०२६** |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **०४/०८/२०२६** |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | – |

**आरोपींची सविस्तर माहीती**

| **आ. क्र.** | **आरोपींचे नाव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जामीनावर सोडल्याचा दिनांक** | **दोषारोप कलम** | **निर्दोष अथवा दोषी** | **शिक्षा दिली असल्यास किती** | **न्यायालयीन बंदी कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष वामन दौंडकर | – | – | भा.द.वी. कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सहकलम ३४ | | | |
| २ | राहुल बाळासाहेब दौंडकर | – | – | भा.द.वी. कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष | – | – |
| ३ | प्रतिक सुभाष दौंडकर | – | – | भा.द.वी. कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष | – | – |

## भाग – क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. तक्रारदारातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | बाजीराव बबन दौंडकर | फिर्यादी |
| २ | स्वपनील बाजीराव दौंडकर | साक्षीदार |
| ३ | सुनिता बाजीराव दौंडकर | साक्षीदार |

ब. आरोपींतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

ब. आरोपींचा पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## ड. मुद्देमाल

| मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|
| | १ दगड |

## :: न्यायनिर्णय ::

## (जाहीर केला दि.०४/०८/२०२६ )

आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ या गुन्ह्यांकरीता संपरीक्षा घेण्यात आलेली आहे.

### अभियोग पक्षाच्या केसची हकीकत अशी की,

२. फिर्यादी यांनी त्यांच्या फिर्यादमध्ये असे कथन केले आहे की, फिर्यादी बाजीराव दौंडकर, त्यांची पत्नी नामे सुनिता दौंडकर व मुले स्वपनील व रविना असे त्यांच्या राहत्या घरासमोर असताना आरोपी नामे सुभाष दौंडकर, राहुल दौंडकर व प्रतिक दौंडकर यांनी संगनमत करुन फिर्यादी यांच्याशी दि.१४/०४/२०१७ रोजी सायंकाळी १८.०० वा.च्या सुमारास शेतातील गबाळ का पेटविले या कारणावरुन फिर्यादी व त्यांच्या घरातील लोकांना शिवीगाळ दमदाटी करुन हाताने लाथाबुक्क्याने मारहाण केले व आपखुशीने जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी सदर आरोपींविरुद्ध चाकण पोलीस स्टेशन येथे कायदेशीर फिर्याद दिली.

३. सदर वर्दीवरुन गु.र.नं.३७९/२०१७ दाखल झाला. पुढील तपास पोलीस हवालदार श्री. ए. एच. ढेकणे यांच्याकडे सोपवला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, वर्दीदार यांचे पुरवणी जबाब नोंदवला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपासाअंती आरोपी यांनी

गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दोषारोपत्रासोबत असलेले कागदपत्रावरुन आरोपी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द नि.क्र.१६ वर दोषारोप निश्चित करण्यात आला. त्यातील मजकूर आरोपी यांना समजावून सांगितला. आरोपींनी अ.क्र. नि.क्र. १७ ते १९ वर त्यांना गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन संपरीक्षा करणेची मागणी केली.

५. अभियोगपक्षाने नोंदविलेला पुरावा आणि युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता उपस्थितीत असून त्यावरील निष्कर्ष कारणासंह मी त्यापूढे नमूद करत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १३/०४/२०१७ रोजी १८.३० वाजणेच्या दरम्यान मौजे साळींबाचा मळा, ता. खेड, जि. पुणे येथे आरोपी क्रं. १ ते ३ यांनी संगनमत करून फिर्यादी बाजीराव दौंडकर व त्यांच्या परिवारातील सदस्य नामे स्वप्नील दौंडकर, सुनिता दौंडकर व रविना दौंडकर यांना साधे दुखापत पोहोचवले आणि त्याद्वारे त्यांनी **भारतीय दंड संहिता कलम, ३२३ सह कलम ३४ अन्वये** गुन्हा केल्याची बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | **नकारार्थी.** |
| २ | घटनेदिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्रं. १ ते ३ यांनी संगनमत करुन स्वप्नील दौंडकर यांना दगडाने मारहाण करुन गंभीर दुखापत | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | केले आणि त्याव्दारे **भारतीय दंड संहिता कलम, ३२४ सह कलम ३४ अन्वये** गुन्हा केल्याची बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | |
| ३ | घटनेदिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्रं. १ ते ३ यांनी संगनमताने फिर्यादी व त्यांच्या परिवारातील लोकांना अपमानित केले आणि त्याव्दारे **भारतीय दंड विधानाचे, कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये** गुन्हा केल्याची बाब अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी.** |
| ४ | घटनेदिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्रं. १ ते ३ यांनी संगनमताने फिर्यादी व त्यांच्या परिवारातील लोकांना फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याचे आणि त्याव्दारे **भारतीय दंड विधानाचे, कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये** गुन्हा केल्याची बाब अभियोग पक्ष सिद्ध करतो काय ? | **नकारार्थी.** |
| ५ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**६.** सदर कामी महत्वाची नमूद करावयाची बाब म्हणजे अभियोग पक्षाने आरोपीविंरुध्दचा गुन्हा निःसंशयपणे सिध्द करावयाचा असतो. त्या अनुषंगाने अभियोग पक्षाने सा.क्र.१ बाजीराव बबन दौंडकर यांना नि.क्र.३८ वर, सा.क्र. २ स्वप्नील बाजीराव दौंडकर यांना नि.क्र. ४१ वर व सा.क्र.३ सुनिता बाजीराव दौंडकर यांना नि.क्र.४२ वर तपासले आहे.

आरोपी यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ नुसार निवेदन नि.क्र. ४५ ते ४७ वर नोंदविण्यात आले.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–**

७. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकाच घटनेशी निगडीत असल्याने प्रतिकथनांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सर्व मुद्दे एकत्रितरित्या विचारात घेण्यात आले आहेत.

८. अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ बाजीराव बबन दौंडकर यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, सन २०१७ साली ते शेती काम करत होते. आरोपी हे त्यांचे चुलत भाउ आहेत. त्यांचे व आरोपींचे शेत एकमेकांच्या शेताला लगत आहे. दि.१३/०४/२०१७ रोजी सांयकाळी ०६.३० वा.च्या सुमारास ते घरी होते. त्यावेळेस भांडण झाले होते. त्यांचे व आरोपीचे गवत बद्दल भांडण झाले होते. वाळलेले गवत त्यांनी पेटवली होती. सुभाष याने त्यांचे गचांडे धरले व त्यांना कानाखाली मारले. राहुल याने त्यांचा मुलगा स्वपनील यास दगडाने मारले त्यामुळे त्याला डोक्याच्या मागे मार लागला होता. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले व पोलीसांनी त्यांना चाकण ग्रामीण रुगणालय येथे पाठविले होते. त्याला तिन टाके पडले होते. वैद्यकीय प्रमाणपत्र थेट पोलीसांना पाठविण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेश्नला फिर्याद दिली. त्यांनी सदर फिर्याद नि.क्र. ३९ व छापील खबर नि.क्र.४० वर ओळखले आहे.

९. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, त्यांना मराठी लिहीता वाचता येते. त्यांनी मान्य केले की, त्यांचे व आरोपी यांचे शेत जवळ जवळ

आहे. पुढे त्यांनी नाकारले की, त्यांचे व आरोपींचे अगोदरपासून वाद असल्यामुळे त्यांच्यात दावा न्यायालयात प्रलंबित आहे, त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारे प्रकरण त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दाखल केले आहे. त्यांच्या घराच्या शेजारी लोकांची घरे व शेती आहे. घटनेच्या वेळेस तिथे लोकांची वर्दळ होती. त्यांनी नाकारले की, आरोपी यांनी त्यांना लाथा बुक्कयांनी, हाताने व दगडाने मारले नसल्यामुळे न्यायालयात मुद्देमाल दाखल नाही, ते ज्यावेळेस वाळलेले गवत जाळले त्यावेळेस आरोपींची तिथे गंजी होती. ते घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला सायंकाळी ०७.०० ते ०७.३० वा.च्या दरम्यान गेले व पोलीसांनी त्यांची तक्रार त्याच दिवशी घेतली. त्यांनी नाकारले की, आरोपी यांनी त्यांना मारहाण केली नाही, त्यांचा मुलगा पळत होता त्यावेळेस तो खाली पडला व त्याला डोक्याला मार लागला म्हणून मुद्देमाल न्यायालयात दाखल नाही, आरोपींचे व त्यांचे पुर्वी पासून वाद असल्यामुळे त्यांनी सदरची खोटी केस त्यांच्याविरुद्ध दाखल केली आहे.

**१०.** सा.क्र. २. स्वपनील बाजीराव दौंडकर यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटनेच्या वेळेस त्यांचे वय १४ वर्ष होते व ते इयत्ता ९ वी पास झाले होते. आरोपी ते त्यांचे चुलते आहेत. सदरच्या दिवशी त्यांच्या वडीलांनी वाळलेले गवत पेटवले होते त्यावर आरोपी यांनी त्यांच्या वडीलांना तुम्ही असे का केले असे विचारुन त्यांच्या वडीलांना व आईला शिवीगाळ केली होती. तसेच, थोडे पुढे आल्यानंतर राहूल दौंडकर व प्रतिक दौंडकर यांनी त्यांना दगडाने हाणामार केली होती. सदर मारहाणीमध्ये त्यांच्या डोक्यात दुखापत झाले होते. त्यांनी त्यांच्या वडीलांना लाथा बुक्कयांनी मारले होते. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले.

तिथून पोलीसांनी त्यांना सरकारी रुगणालयात पाठविले होते. तिथे त्यांच्यावर औषधोपचार झाले व डॉक्टरांनी त्यांच्या डोक्याला टाके दिले होते.

**११.** सदर साक्षीदार यांनी पुढे त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, त्यांचे शिक्षण बी.कॉम पर्यंत झाले आहे, आरोपी हे त्यांच्या घराशेजारीच राहण्यास आहेत, प्रतिक हा त्यांच्यापेक्षा वयाने लहान आहे, घटनेच्या वेळेस त्यांचे वय १४ वर्ष होते व प्रतिक हा त्यांच्यापेक्षा लहान होता, घटनेच्या वेळेस ते तिथे नव्हते, त्यांना ज्यावेळेस घटनेबाबत माहित पडले त्यावेळेस ते लगेच घटनास्थळावर गेले, घटनेच्या ठिकाणी खुप दगड पडले होते. पुढे त्यांनी नाकारले की, सदर घटनेमध्ये आरोपी यांनी त्यांना मारले, ते स्वतः खाली पडले, त्यांना कोणीही मारले नाही, अशी कोणतीही घटना घडलेली नाही, त्यांच्या वडीलांमध्ये व आरोपींमध्ये नेहमी वाद होत असतात.

**१२.** सा.क्र.३. सुनिता बाजीराव दौंडकर यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपी हे त्यांच्या शेजारी राहण्यास आहेत. घटनेच्या दिवशी त्यांनी घराभोवती गवताचा पाचोळा जाळला होता. त्यामुळे आरोपी नामे सुभाष दौंडकर यांनी त्यांच्यासोबत भांडण केले होते. सुभाष दौंडकर हे त्यांचे दिर आहेत. घटना सायंकाळी ०६.३० वा.च्या सुमारास घडली होती. सदर घटनेत त्यांच्या मुलाला राहुल दौंडकर यांनी दगडाने मारले होते. तसेच, त्यांचे पती यांना सुभाष दौंडकर यांनी लाथाबुक्क्यानी व उसाच्या टिप–यांनी मारले. त्यानंतर ते सर्व दवाखान्यात गेले. डॉक्टरांनी त्यांच्या मुलाला पट्टी केली. त्यानंतर ते सर्व तिघे जावून पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली.

**१३.** सदर साक्षीदार यांनी त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, त्यांचे शिक्षण झाले नाही. घटना सायंकाळी ०६.३० वाजता घडली होती. त्यांना घटनास्थळाचे चतुःसिमा सांगता येत नाही. त्यांनी नाकारले की, ते जिथे गवत जाळले होते तिथे आरोपी यांनी गवताची गंजी देखील होती. घटनेच्या वेळेस त्यांच्या मुलाचे वय १५ ते १६ असे होते. प्रतिक हा त्यांच्या मुलापेक्षा वयाने लहान आहे असे मान्य केले आहे. त्यांनी नाकारले की, त्यांना कोणीही मारहाण केली नाही, घटनेच्या वेळेस त्यांचा मुलगा तिथे नव्हता, त्यांचा मुलगा पळत येत असताना तो खाली पडला व त्याला मार लागला होता. घटनेच्या वेळेस तिथे लोकांची वर्दळ होती असे त्यांनी मान्य केले. घटनास्थळाच्या आजुबाजूला लोकांचे राहते घरे आहेत असे देखील मान्य केले. घटनेच्या ठिकाणी आरडाओरडा झाला होता असे मान्य केले. आजुबाजूचे लोक आरडाओरडा ऐकून घटनास्थळावर आले नाहीत. ते का आले नाहीत त्याचे कारण त्यांना सांगता येत नाही. त्यांचे सगळयांसोबत तिथे वाकडे असल्यामुळे भांडण सोडवायला कोणीही आले नाही असे त्यांनी नाकारले. त्यांनी नाकारले की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही, यापुर्वी देखील त्यांनी तक्रारी दिले आहे. फिर्याद त्यांनी स्वतः दिली आहे. फिर्याद त्यांनी घटनेच्या दुस–या दिवशी दिली. त्यांनी नाकारले की, त्यांचे व आरोपी यांचे शेतीबाबत वाद चालू आहे. वाद चालू आहे याबाबत त्यांना माहित नाही.

**१४.** सर्वप्रथम येथे महत्वाची बाब अशी आहे की, साक्षीदार क्रं. १ यांचा साक्षीदार क्रं. २ हा मुलगा असून सा.क्र.१ हे साक्षीदार क्रं. ३ यांचे दिर आहेत. सदरच्या प्रकरणात सा.क्र. २ व ३ यांनी सा.क्र. १ यांच्या साक्षीस भक्कम दुजोरा मिळावा म्हणून असे कोणतीही

साक्ष दिली नाही. तसेच, आरोपी व फिर्यादी यांनी नि.क्र.४४ वर त्यांच्यात तडजोड झाल्या बाबतची पुरसीस दाखल केली आहे व त्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी, साक्षीदार व आरोपी क्रं. १ ते ३ यांच्यामध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाली असून त्यांची एकमेकांविरुद्ध कोणतीही तक्रार राहिली नसल्याने फिर्यादी यांना सदरचे प्रकरण आरोपींविरुद्ध चालवायचे नाही. तसेच, इतर कोणतेही साक्षीदार तपासायचे नाहीत असे तडजोड पुरसीस त्यांनी दाखल केली आहे.

**१५.** फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांचेमध्ये एकमेकांबद्दल गैरसमज होवून प्रस्तुतची तथाकथित केस झालेली होती. सा. क्र. १ ते ३ व आरोपी यांचेमध्ये गैरसमज दूर करुन त्यांचेमध्ये कोर्टाबाहेर आपआपसातील भांडण मिटले आहे. त्यांचेमध्ये आता कोणताही वाद अगर भांडणतंटा राहिलेला नाही. त्यांचेमध्ये आता पूर्वीसारखे संबंध निर्माण झालेले आहेत. या कारणास्तव त्यांचे परस्परसंबंध चांगले राहणेकरिता फिर्यादी व आरोपींमधील भांडण मिटले असल्याचे दिसून येते. सबब, आरोपी क्रं. १ ते ३ यांनी सगंनमत करुन फिर्यादी व त्यांच्या घरातील लोकांना शिवीगाळ दमदाटी करुन हाताने लाथाबुक्कयाने मारहाण केले व आरोपी क्रं. २ यांनी स्वपनील दौंडकर यांच्या डोक्यात दगडाने मारहाण करुन गंभीर दुखापत केले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब सबळ पुराव्यानिशी निःसंशयपणे शाबित झालेली नाही. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता, आरोपी हे पुराव्याअभावी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, **मुद्दा क्र.१ ते ४** चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्र.५ करीता** :–

१६. याकामी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाचे विरोधात अपील दाखल झाल्यास त्या अपीलात हजर राहण्याची हमी म्हणून आरोपी यांनी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे वैयक्तिक जातमुचलके व जामीनकदबे द्यावेत असा आदेश करणे उचित होणार आहे. सबब, **मुद्दा क्र.५** च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. आरोपी **क्र.१) सुभाष वामन दौंडकर, २) राहुल बाळासाहेब दौंडकर व ३) प्रतिक सुभाष दौंडकर** यांना **भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम ३४** अन्वये गुन्ह्यांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीनकदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ प्रमाणे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकदबे प्रत्येकी र.रु. १५,०००/– चे दाखल करावयाचे आहेत.

४. सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल १ दगड मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर त्याचे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JYOTIMALA C GUPTA

Digitally signed by JYOTIMALA C GUPTA
Date: 2026.08.04 17:44:24 +0530

ठिकाण – खेड-राजगुरुनगर (श्रीमती जे.सी.गुप्ता)

दिनांक ०४/०८/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड

राजगुरुनगर, जि. पुणे.